Exh. 9/D

दि. कि. अ. नं. २४/२०२६

# मे. प्रमुख जिल्हा न्यायाधिशसो कोल्हापूर यांचे कोर्टात-

श्री. आदगोंडा आण्णा पाटील, वगैरे - अर्जदार

**विरुद्ध**

श्री. अनमोल आदगोंडा पाटील - वि. प.

O
otherside to say
P.D.J. Kop
5-5-26

**सि. पी. सी. ऑ. ६ रु. १७ प्रमाणे अर्ज-**

यातील वि. प. तर्फे विनंती अर्ज असा की,

प्रस्तुत अर्जदार यांनी सदरचा अर्ज हा सि. पी. सी. कलम २४ प्रमाणे दाखल केला आहे. सदर अर्जास वि. प. यांनी दि. १६/०३/२०२६ रोजी आपले म्हणणे दाखल केलेले आहेत. तथापी म्हणण्यातील कलम ९ मधील ओळ क्र. ४ मध्ये "आहे" हा शब्द नजर चुकिने व टंकलेखनातील दोषामुळे "नाही" ऐवजी टाईप झालेला आहे. तो शब्द दुरुस्तीकरिता सदरचा अर्ज देणे भाग पढले आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असून नजरचुकीने व अनावधानाने झालेली आहे. दुरुस्तीस परवानगी दिलेस अर्जदार यांचे काहीही नुकसान होत नाही, याऊलट न दिलेस वि. प. यांचे अपरिमीत असे नुकसान होणार आहे.

5.5.26
ant Superintendent

मल्टिप्लीसीटी ऑफ प्रोसिडींग्स टाळणेकरिता दुरुस्तीस परवानगी देणे गरजेचे आहे.

----------

सबब वि. प. यांच्या म्हणण्यातील कलम ९ मधील ओळ क्र. ४ मध्ये टाईप झालेल्या “आहे” या शब्दास काट देऊन त्याठिकाणी “नाही” हा शब्द लिहीणेस परवानगी असावी अशी विनंती आहे.

मे. जा. व्हावे,

दि. ०५/०५/२०२६

______________

# ॲफिडेव्हीट

मी अनमोल आदगोंडा पाटील, व. व. २३ धंदा. नोकरी, रा. आलास, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की,

१) मी यातील वि. प. आहे.

२) वरिल अर्जातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे.

----------

म्हणून केले ॲफिडेव्हीट. दि. ०५/०५/२०२६

ॲफिडेव्हीट करणारेस ओळखतो,

(ॲड. ए. डी. कल्लण्णावर)

______________

## प्रतिज्ञा

मी अनमोल आदगोंडा पाटील, व. व. २३, धंदा. नोकरी, रा. आलास, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वरिल अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा.

ता. म. सदर

Solemnly Affirmed before me by
Shri Anomol Adagonda Patil age 23
of R/o Alas Tal. Shirol, Dist. Kop. who is
identified by Shri A. D. Kallannawar adv.
whom I know personally
Dated 5.5.26

Kolhatkar
Assistant Superintendent
CIVIL COURT Jr. Dn.
KURUNDWAD